## डॉ.एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स पवनी जि. भंडारा

### एक दिवसीय चर्चासत्र

### दिनांक ०७ ऑक्टोबर २०१९

### विषय :— बौद्‌धिक संपदा अधिकार **(Intellectual Property Rights)IQAC** अंतर्गत.

### कार्यक्रमाची रूपरेषा

| | |
|---|---|
| सुत्रसंचालन | :— प्रा. विलास मेश्राम |
| कार्यक्रमाची सुरूवात | :— स्वागत गीत |
| | विद्यापीठ गीत |
| अध्यक्ष | :— डॉ. जे. आर. संतोषी (प्राचार्य) |
| स्वागत | :— प्रा. संजय नंदागवळी |
| प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक | :— सन्माननीय. डॉ. अशोक खोब्रागडे, , प्रा. प्रेमा कुंभलकर मॅडम |
| स्वागत | :— डॉ. स्वाती शंभरकर |
| नॅक समन्वयक | :— प्रा. संजय नंदागवळी |
| स्वागत | :— प्रा. जगदिश जांगळे |
| समन्वयक | :— डॉ. स्वाती शंभरकर |
| स्वागत | :— विद्यार्थी |
| प्रास्ताविक/परिचय | :— प्रा. संजय नंदागवळी |
| अतिथीचे मार्गदर्शक | :— डॉ. अशोक खोब्रागडे, ग्रंथपाल ऑर्ट अ‍ॅण्ड कॉमर्स नाईट कॉलेज महाल, नागपूर. |
| अध्यक्षांचे भाषण | :— डॉ. जे. आर. संतोषी (प्राचार्य) |
| आभार प्रदर्शन | :— प्रा. जगदिश जांगळे |

Scanned by CamScanner

# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी जिल्हा भंडारा

## बौद्धीक संपदा अधिकार

## सत्र – २०१९–२०

## अहवाल

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी येथे ग्रंथालय विभाग व IQAC अंतर्गत बौद्धीक संपदा अधिकार या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन दिनांक ०७ ऑक्टोबर २०१९ ला करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयकिशन संतोषी, या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अशोक खोब्रागडे, ग्रंथपाल आर्टस ॲण्ड कॉमर्स नाईट कॉलेज नागपूर, डॉ. प्रेमा कुंभलकर, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. स्वाती शंभरकर व IQAC समन्वयक प्रा. संजय नंदागवळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अशोक खोब्रागडे यांनी Copy Right Piracy Act Pete tent आपण लावलेल्या शोधाविषयी कुणी त्याची नक्कल करू नये जेणेकरून मुळ शोधकर्त्या ऐवजी दुसराच व्यक्ती शोधकर्ता म्हणून पूढे येईल. त्याचप्रमाणे मुद्रीत पुस्तकांची कुणीही प्रति कॉपी व सत्यप्रत काढू नये जेणे करून मुळ पुस्तकांच्या ग्रंथकर्त्याला किंवा प्रकाशकाला आर्थिक हानी होणार नाही. बौद्धीक संपदा, बौद्धीक अधिकाराचा परिचय, त्याची व्याप्ती तसेच त्याच्या संरक्षणाची जबाबदारी यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक यांच्या सृजनशिलतेला चालणा देवून त्यांच्या बौद्धीक संपदेच्या संरक्षणाची जबाबदारी महाविद्यालयाने स्वीकारावी असे आव्हान प्रा. संजय नंदागवळी यांनी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयकिशन संतोषी यांनी महाविद्याालयातील विद्यार्थ्यांनी पावले उचलण्याची गरज आहे हे पटवून दिले. या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. स्वाती शंभरकर यांनी बौद्धीक संपदा अधिकारासंबंधी घटनेत असणारे कायदे मुद्रण सहिंता, कायदा प्रकाशन व हक्क इ. मौलिक विचार प्रस्तावनेतून सांगीतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विलास मेश्राम केले तर आभार प्रा. जगदिश जांगळे यांनी मानले. या कार्यक्रमास समस्त प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक ०८/१०/२०१९

समन्वयक

डॉ. स्वाती शंभरकर

Scanned by CamScanner




डॉ. एल.डी. बल्खंडे कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स, पवनी येथे "बौद्धिक संपदा अधिकार" या विषयावर आय.क्यु.ए.सी. अंतर्गत दि. ०८ ऑक्टो. २०१९ ला एक दिवसीय चर्चासत्रास मार्गदर्शन करतांना नॅक समन्वयक प्रा. संजय नंदागवळी तसेच उपस्थित विद्यार्थी




डॉ. एल.डी. बल्खंडे कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स पवनी येथे "बौद्धिक संपदा अधिकार" या विषयावर आय.क्यु.ए.सी. अंतर्गत दि. ०८ ऑक्टो. २०१९ ला एक दिवसीय चर्चासत्रास मार्गदर्शन करतांना

Scanned by CamScanner

मराठी दैनिक
लोकजन
गोंदिया - भंडारा प्रवाह
4
दि. 16 ऑक्टोबर 2019

# बलखंडे कॉलेज येथे 'बौद्धिक संपदा अधिकार' विषयावर एकदिवसीय चर्चासत्र

**पवनी :-** स्थानिक डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स, पवनी येथे 'बौद्धिक संपदा अधिकार' या विषयावर आयक्यूएसी अंतर्गत एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अशोक खोब्रागडे, ग्रंथपाल आर्ट अ‍ॅण्ड कॉमर्स नाईट कॉलेज नागपूर हे होते. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जयकिशन संतोषी व कार्यक्रमाचे समन्वयक ग्रंथपाल डॉ. स्वाती शंभरकर व नॅक समन्वयक प्रा.संजय नंदागवळी व्यासपीठावर विराजीत होते.



चर्चासत्राची सुरुवात ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. त्यानंतर चर्चासत्राचे प्रास्ताविक तसेच या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. स्वाती शंभरकर यांनी बौद्धिक संपदा अधिकारा संबधी घटनेत असणारे कायदे मुद्रण सहिता कायदा प्रकाशन हक्क इत्यादी संबधी मौलिक विचार व पाहुण्यांचा परिचय करून देतांना सांगितले.

नॅक समन्वयक प्रा. संजय नंदागवळी यांनी कुठल्याही गोष्टाचा मुळ शोधकर्ता असतो व त्या शोधाचे अधिकार आणि हक्क हे त्या व्यक्तीचे असते अशी कायद्यात तरतूद असते. हे छोट्या छोट्या उदाहरणावरून विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अशोक खोब्रागडे यांनी कॉपी रॉईट, पायरसी अ‍ॅक्ट, पेटेन्ट तसेच आपण लावलेल्या शोधाविषयी कुणी त्याची नक्कल करु नये की, जेणेकरुन मूळ शोधकर्त्याऐवजी दुसराच व्यक्ती शोधकर्ता म्हणून पुढे येईल. त्याचप्रमाणे मुद्रीत पुस्तकाची कुणीही प्रतिकॉपी किंवा सत्यप्रत काढू नये जेणेकरुन मुळ पुस्तकांचा ग्रंथकर्त्याला किंवा प्रकाशकाला आर्थिक हानी होणार नाही. याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. बौद्धिक संपदा, बौद्धिक संपदा अधिकाराचा परिचय, त्याची व्याप्ती तसेच त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी महाविद्यालयाने स्विकारावी असे आव्हान केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जयकिशन संतोषी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे हे पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विलास मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. जगदिश जांगळे यांनी मानलेत. या कार्यक्रमात महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. अनिल कोसमकर, प्रा. संजय नंदागवळी, प्रा. जगदिश जांगळे, प्रा. नंदकिशोर शिंगाडे, प्रा. मंगेश वाहाणे, प्रा. शरद गजभिये, प्रा. नाना जाधव, प्रा. भगवंत शाभणे, प्रा. रमेश नगराळे, प्रा. माणिक लोथे, डॉ. संजय बागडे, डॉ. महादेव बन्सु तसेच प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि समस्त विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Scanned by CamScanner